# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Stolen Property**

**Police Station** :- **Malegaon**

**Date of Good Work done** :- **28/10/2020**

**Brief of the work done :-**

मालेगाव - मित्राच्या मदतीने सोन्याचे दागिने चोरणाऱ्यास २ तासात अटक, मालेगाव पोलिसांची कारवाई. दि. २८/१०/२०२०

# मित्राच्या मदतीने सोन्याचे दागीने चोरणाऱ्यास २ तासात अटक

- मालेगाव पोलिसांची कारवाई
- दोघांना अटक एक दिवसाची पोलिस कोठडी

**वाशिम** ▪ जिल्हा प्रतिनिधी

आयपीएल मॅचच्या सट्ट्यामध्ये पैसे हारल्याने आरोपी तेजस मिश्राने मित्राच्या सहाय्याने स्वतःच्या घरी ३ लाख रुपये दागीन्याची दिवसाढवळ्या चोरी करण्याचा प्रकार मालेगाव पोलिसांनी आरोपींना दोन तासात अटक केली. या प्रकरणात फिर्यादीचा मुलगाच आरोपी निघाल्याने आयपीएल मॅच सट्ट्याचे व्यसन युवकांना कसे चोरीच्या मार्गाला लावते हे या घटनेतून उघड झाले आहे.



मालेगाव येथील अर्चना राजेंद्र मिश्रा यांच्या घरातील तीन लाख रुपये किंमतीचे दागीने मित्राच्या सहाय्याने लंपास करणाऱ्या फिर्यादीच्या चोरट्या मुलास मालेगाव पोलिसांनी मुद्देमालासह दोन तासात अटक केली. अर्चना राजेंद्र मिश्रा यांच्या घरी २५ ऑक्टोबर रोजी सकाळी १० च्या दरम्यान चोरी झाली. अर्चना मिश्रा या संतोषीमाता मंदिरात साफसफाई करण्यासाठी आपल्या लहानमुलासह गेल्या होत्या तर मोठा मुलगा घरीच होता. मोठा मुलगा नामे तेजस मिश्रा (वय २२) हा सुध्दा मंदिराच्या ठिकाणी साफसफाई करण्यासाठी गेला. दुपारी अडीच वाजता अर्चना मिश्रा घरी आल्या असता घरातील कपाटाचे दार त्यांना उघडे दिसले. कपाटातील सोन्याचे दागीने व नगदी १० हजार रुपये लंपास झालेले त्यांना दिसले. दागीण्यामध्ये एक सोन्याची साखळी लॉकेटसह, ब्रास्लेट, पेंडॉलसह गहुपोत, चार डोरले, चार कर्णफुल, दोन अंगठ्या, खुले मणी व चांदिचे शिक्के असा जवळपास तीन लाख रुपयांचा ऐवज चोरट्यांनी चोरुन नेला. आरोपी तेजस मिश्रा याच्यांकडून पोलिसांनी सोन्याचे दागीने, चांदिचे शिक्के व ३ हजार ३६० रुपये असे एकुण १ लाख ५१ हजार ८५० रुपये हस्तगत केले. विशेष म्हणजे आरोपीने उर्वरीत दागीने हे मालेगाव व वाशिम येथील सुवर्णकार यांच्याकडे विकले असून, ते दागीने हस्तगत करणे बाकी असल्याचे मालेगाव पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणात पोलिसांनी तेजस मिश्रा व अनिकेत सारस्कर या दोघांना अटक केली. असून, त्यांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने एक दिवसाची पोलिस कोठडी सुनावली. या गुन्ह्याचा तपास मालेगावचे ठाणेदार आधारसींग सोनोने यांच्या मार्गदर्शनात सपोनी गव्हाणे व नापोकॉ संदिप निखाडे, कैलास कोकाटे, ना.पो.कॉ शफिक खान, गजानन झगरे, पो.कॉ. गजानन खंडारे यांनी ही कारवाई केली.

अर्चना मिश्रा यांनी दागीने चोरीची तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल केला. पोलिसांनी सदरचे चोरीचे प्रकरणी दिवसाढवळ्या घडल्याने या प्रकरणाचा तपास शिताफिने केला असता फिर्यादीचा मोठा मुलगा तेजस राजेंद्र मिश्रा हा आयपीएल मॅचच्या सट्ट्यामध्ये पैसे हारल्याने तेजसने घरातील सोन्याचे दागीने व नगदी पैसे चोरुन नेल्याचे पोलिसांच्या तपासात कबुल केले. चोरलेले काही दागीने गहाण ठेवण्याकरीता अनिकेत गजानन सारस्करकडे दिले असून, बाकीचे दागीने आपण लपवुन ठेवल्याची कबुली पोलिसांना दिली.

ePaper देशोन्नती
Wed, 28 October 2020
https://deshonnati.digitaledition.in/c/55964327